# मराठा समाजाचे आरक्षण योग्यच

(पान १ वरुन) मराठा आरक्षण राज्य घटनेविरुद्ध नसून घटनेला अनुसरुनच आहे. आरक्षण देण्याची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू शकते. त्यासाठी संबंधित समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे, हे सिद्ध करणे आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले. आधीच्या सरकारच्या समितीचा व गोखले इन्स्टिट्युचा अहवाल लक्षात घेता राज्य सरकारचा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय योग्य आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या सरकारच्या निर्णयावर देण्यात आलेली स्थगिती हटवण्यात यावी, अशी विनंतीही राज्य सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयाला केली आहे. या सर्व याचिकांवरील सुनावणी न्या. अनुप मोहता यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे १३ डिसेंबरला होणार आहे.